महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे-४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD . PUNE - 411005

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781/82/83 / 25536712(OFF)

FAX- 020/25536761
E-MAIL - sscboardpune@gmail.com
Website- www.sscboardpune.in


कमांक : पुविमं / शाखा पी–1 / 7850
पुणे–411004
दिनांक. 29 / 12 / 2023

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,व कनिष्ठ महाविद्यालय,
पुणे / अहमदनगर / सोलापूर

विषय:– इयत्ता 10 वी व इयत्ता 12 वी परीक्षा मार्च 2024 च्या परीक्षेस प्रविष्ठ होणा–या शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत 'आऊट ऑफ टर्न' ने आयोजित करण्यात येणा–या प्रात्यक्षिक,श्रेणी, तोंडी व तत्सम परीक्षांबाबत......

संदर्भ:– क.रा.मं. / परीक्षा–2 / 5508 दिनांक 26 / 12 / 2023 रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयास व संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, इयत्ता 10 वी व इयत्ता 12 वी परीक्षा मार्च 2024 परीक्षेपासून गणकयंत्र विभागांमार्फत सर्व शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना ऑनलाईन online पध्दतीने प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व तत्सम परीक्षा मूल्यमापनाचे गुण login करुन भरण्याची सुविधा देण्यात येणार आहे. सदर डाटा केंद्रनिहाय उपलब्ध करुन दिला जाणार नाही , याची नोंद घ्यावी.

1. फेब्रुवारी / मार्च 2024 च्या परीक्षेस प्रात्यक्षिक परीक्षा प्रचलित पध्दतीनुसार केंद्रावर घेतली जाणार नसून, यामध्ये बदल करण्यात येत असून प्रचलित परीक्षेऐवजी इ. 10 वी व 12 वी च्या प्रात्यक्षिक परीक्षा संबधित शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांमध्येच घेण्यात यावी आणि याच पध्दतीने 'आऊट ऑफ टर्न' याबाबतदेखील कार्यवाही करण्यात यावी.
2. जुलै / ऑगस्ट 2024 च्या परीक्षेस प्रात्यक्षिक परीक्षा प्रचलित पध्दतीनुसार केंद्रावर घेतली जाते. तसेच यामध्ये बदल करण्यात येऊन इ. 10 वी व 12 वी च्या प्रात्याक्षिक परीक्षादेखील संबधित शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये घेण्यात यावी.

उपरोक्त प्रमाणे सर्व शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांमार्फतच प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व तत्सम परीक्षा मूल्यमापनाचे गुणदान online पध्दतीने करण्यात यावे.

सोबत :– उपरोक्त संदर्भिय पत्र

(औदुंबर उकिरडे )
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे–411005

प्रत माहितीस्तव तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव:-
१. मा.सचिव, रा.मं
२. मा. विभागीय शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग, पुणे-१
३. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), पुणे/अहमदनगर/सोलापूर

Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.न.८३२ ए, फा.प्लॉ.नं.१७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 ।
Email : secretary.stateboard@gmail.com

परीक्षा प्राधान्य/महत्वाचे

क्र.रा.मं./परीक्षा-२/5508
पुणे-४११००४
दिनांक- २६/१२/२०२३

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
सर्व विभागीय मंडळे,

विषय - इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी 'आऊट ऑफ टर्न' ने आयोजित करण्यात येणाऱ्या प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व तत्सम परीक्षांबाबत..

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की,

१. माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२४ परीक्षेपासून गणकयंत्र विभागामार्फत सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना online पध्दतीने प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व तत्सम परीक्षा मूल्यमापनाचे गुण login मधून भरण्याची सुविधा देण्यात येणार आहे.

सदर डाटा केंद्रनिहाय उपलब्ध करून दिला जाणार नाही. त्यामुळे सर्व विभागीय मंडळांनी फेब्रुवारी-मार्च २०२४ च्या परीक्षांपासून 'आऊट ऑफ टर्न' ने आयोजित करावयाच्या प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व तत्सम परीक्षा संबंधित शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांमार्फतच आयोजित करण्यात याव्यात.

२. जुलै-ऑगस्ट पुरवणी परीक्षेसाठी इ. १० वी व इ. १२ वी ची प्रात्यक्षिक परीक्षा प्रचलित पध्दतीनुसार केंद्रावर घेतली जाते. तथापि त्यामध्ये बदल करण्यात येऊन इयत्ता १० वी व इ. १२ वी ची प्रात्यक्षिक परीक्षा देखील संबंधित शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये घेण्यात यावी.

तरी फेब्रुवारी-मार्च २०२४ परीक्षेपासून 'आऊट ऑफ टर्न' ने आयोजित करण्यात येणाऱ्या प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व तत्सम परीक्षांबाबत तसेच जुलै-ऑगस्ट इ. १० वी व इ. १२ वी पुरवणी परीक्षेतील प्रात्यक्षिक परीक्षेच्या आयोजनाबाबत उपरोक्त प्रमाणे केलेल्या बदलाची नोंद घेवून पुढील उचित कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य मंडळ कार्यालयास सादर करावा.

(अनुराधा ओक)
सचिव
राज्य मंडळ, पुणे ०४.

प्रत माहितीस्तव-
व्यवस्थापक,
गणकयंत्र विभाग,
राज्य मंडळ, पुणे